मोटार अपघात दावा क्र.७२/२०२३
अर्जून वि. बालाजी.
नि.क्र.१९

**<u>गैरअर्जदार क्र.१ व त्यांचे विधीज्ञ गैरहजर - उलट तपास नाही.</u>**

**<u>गैरअर्जदार क्र.२ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.एस.एस.शिवपूरकर यांच्या वतीने</u>**

१. मोटार सायकल ही माझ्या मालकीची होती. माझ्याकडे वाहन चालविण्याचा परवाना आहे. तो मी पुढील तारखेला दाखल करू शकतो. अपघात झाला त्या ठिकाणी १५ फुटाचा डांबरी रस्ता व ५ फुटाचा कच्चा रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी डांबरी रस्त्यावर बोलत थांबलेलो होतो. अपघात झाला त्यावेळी रात्रीचे ९.०० वाजलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, जी कार आली ती न थांबता निघून गेली. मला गाडीचा क्रमांक कोणीही सांगितला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या गाडीने धडक दिली ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व ज्ञानोबा जाधव असे दोघेही माझ्या मोटार सायकलवरून पडल्यामुळे आम्हाला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दोघेही दारू पिलेल्या अवस्थेत होतो. हे म्हणणे खरे नाही की, अपघात माझ्या चुकीमुळे झालेला आहे.

२. शेती काही माझ्या नावावर व काही वडिलांच्या नावावर आहे. शेतामध्ये ज्वारी, गहू ही पिके पेरलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला व्यवस्थित चालता फिरता येवू लागले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणतेही कायमस्वरूपी अपंगत्व आलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पूर्वीसारखेच काम करून पूर्वी इतकेच उत्पन्न मिळवित आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

Digitally signed by PADMAKAR PRABHAKAR KESTIKAR
Date: 2026.02.23 13:06:33 +0530

(पी.पी.केस्तीकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ व
पदसिध्द सदस्य,मो.अ.दा.प्रा.,
लातूर.

दि.२३/०२/२०२६